**निशाणी ०१**

**संक्षीप्त फौ. खटला क्र.३३२/२०२३**
सरकार विरुध्द प्रभाकर वगैरे
**CNR No.**MHLA060030042023

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याचा दिनांक | – | ०५/०४/२०२३ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | – | ०५/०४/२०२३ |
| ३. | फिर्यादीचे नांव | – | **मोहन गोरोबा सुरवसे ,पो.हे.का** पोलीस स्टेशन, अहमदपूर. |
| ४. | आरोपीचे नाव | | **१. प्रभाकर गुणवंतराव कापसे,** वय– ५२ वर्ष, कामधंदा– मजूरी, रा.शिरूर ताजबंद, ता.अहमदपूर, जि.लातूर |
| ५. | गुन्हयाचा तपशील | – | |

दिनांक ०५/०४/२०२३ रोजी २०.३० वाजताच्या सुमारास मौजे शिरूर ताजबंद येथील शिरूर ताजबंद ते अहमदपूर जाणाऱ्या रोडवर इंद्रायणी हॉटेलसमोर तुम्ही आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी लोकांकडून पैसे घेवून मिलन नाईट नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना मिळून आलात आणि याद्वारे तुम्ही महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला.

६. **<u>आरोपी क्र.१ चे प्रतिकथन</u>**

प्रश्न – तुम्हाला पोलीस केस पेपरच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर – होय.
प्रश्न – तुम्हाला वाचून दाखविलेला आरोप तुम्हाला समजला काय ?
उत्तर – होय.
प्रश्न – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर – होय, आम्हाला गुन्हा कबूल आहे.

----------

आरोपी क.०१ ची स्वाक्षरी/अंगठा

**निशाणी ०१**

'समक्ष',

दिनांक १३/११/२०२५ **(स्वानंदी दे. वडगांवकर )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर

आरोपी क्र.१ यास माझे समक्ष आरोपी क्र.१ चा तपशील त्याच्या भाषेत वाचून दाखविण्यात आला, तो त्यास कबूल आहे.

**–: आदेश :–**

(दिनांक १३/११/२०२५)

प्रस्तुत प्रकरणात आरोपी क्र.१ ने स्वतः जाणीवपूर्वक गुन्हा कबूल असले बाबत पुरसीस निशाणी क्र.**०५** कडे दाखल केली. आरोपी क्र.१ ने गुन्ह्याच्या गांभीर्याबाबत व शिक्षेबाबत समजावून सांगितले. तसेच आरोपी हे जाणीवपूर्वक गुन्हा कबूल करत असल्याची खात्री करुन घेतली. आरोपी क्र.१ ने कमीतकमी दंड व शिक्षा व्हावी अशी विनंती केली. अभिलेखाच्या अवलोकनांती आरोपी क्र.१ यासारख्या गुन्ह्यात शिक्षा झाल्याचे दिसून येत नाही. उपरोक्त कथनांच्या विचारांती आरोपी क्र.१ वरील असणारी जबाबदारी पाहता, माझ्या मते खालील प्रमाणे आदेश करणे न्यायसंगत ठरेलः–

**–: आदेश :–**

०१. आरोपी क्र.**१. प्रभाकर गुणवंतराव कापसे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये जुगार कायदा कलम १२(अ) च्या गुन्हयाकरीता दोषी धरण्यात येते व रक्कम **रुपये ३००/– (तिनशे रुपये)** द्रव्य दंडाची आणि कोर्ट उठेपर्यंत निगराणीत राहण्याची शिक्षा देण्यात येत आहे. जर आरोपी क्र.१ द्रव्य दंडाची रक्कम भरली नाही तर आरोपी क्र.१ ने ०३ दिवसांची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

०२. अभिग्रहण करण्यात आलेला जप्त मुद्देमाल रोख रक्कम २४५०/– रुपये (दोन हजार चारशे पन्नास) हे आरोपी क्र.२ च्या संपरीक्षेसाठी राखून ठेवण्यात यावा. (आदेश खुले न्यायालयात जाहीर).

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.11.13 16:39:17 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर )**

दिनांक १३/११/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर